# ‘मरुभूमीतील मृद्गंध’

श्रीकांत मुंदरगी

रिया पब्लिकेशन्स्

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर - ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com



'मरुभूमीतील मृद्‌गंध'
श्रीकांत मुंदरगी

© सुरक्षित

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर - ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखक**
श्रीकांत मुंदरगी
'शिल्पसंकेत'
श्री मातोश्री गणेश मंदिरामागे,
नागाळा पार्क, कोल्हापूर - ४१६००३
फोन नं. ०२३१-२६५३८२८ मो. नं. : ९३७००२८०७४

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २६०/-

# मनोगत

ही कथा आहे एक स्त्रीची. तिचा जन्म झाला सोमालियात. त्याला देश म्हणायचं कारण तो जगाच्या नकाशात आहे. आफ्रिकेच्या वाळवंटातला एक मागासलेला देश. आधुनिक जगाची तोंडओळख नसलेला पुराणमतवादी देश. जुनाट चाली-रीती आणि परंपरांच्या शृंखलांत अडकलेला. अशा या देशाच्या एका अज्ञात कोपऱ्यात एका झोपडीत ती जन्मली. खायला चार घास अन्न नाही, अंग झाकायला धड कपडा नाही. शिक्षणाचा तर संबंधच नाही. शेळ्यांची राखण करत करत ती मोठी झाली. अशा वातावरणात वाढलेल्या मुलीला कुठलं आलंय उज्ज्वल भविष्य? पण नियतीच्या लीला अगाध असतात हेच खरं!

कृष्णवर्णीय जमातीत ती जन्मली पण काळीभोर नव्हती. शिवाय ती नाकीडोळी नीटस होती. प्रतिकूल परिस्थितीत वाढलेली ही पोरगी होती मात्र काटक. वयात येण्याआधीच मोलकरणीचं काम करण्यासाठी तिला लंडनला नेण्यात आलं. तिथं तिला ढोरासारखं राबवून घेण्यात आलं. मात्र अन्न-वस्त्र-निवारा या गोष्टींची सोय झकास झाली. एका सुरवंटाचं रूपांतर फुलपाखरात झालं.

या फुलपाखरानं चिमुकल्या पंखांच्या बळावर आकाशात झेप घेतली. एका रात्रीत ती प्रसिद्धीच्या प्रखर प्रकाशझोतात आली. प्रसिद्धीच्या पाठोपाठ पैसाही तिच्याकडं चालत आला. ती वैभवात लोळू लागली.

तिची कहाणी म्हणजे रॅम्प टू रिचेस स्टोरी आहे. एक परीकथा आहे. मेड टू मॉडेल हा तिचा प्रवास अक्षरशः अचंबित करणारा आहे. पाहता पाहता ती पिरेल्ली कॅलेंडच्या मुखपृष्ठावर झळकली. मॉडेलिंगसाठी मागण्यांचा वर्षाव झाला. थक्क करून सोडणारी तिची कथा आघाडीच्या प्रसारमाध्यमांनी प्रसृत केली. सारं काही एखाद्या विलक्षण चित्रपट कथेला साजेसं. तिच्या जीवनावर चित्रपट

निघाले. अभिनेत्री बनून तिनं त्यांत कामही केलं. तिच्यावर बरीच पुस्तकंही लिहिली गेली. पंधरा वर्षांपर्यंत निरक्षर असलेल्या या मुलीनं अक्षरांशी मैत्री केली, इंग्रजी भाषा शिकून घेतली आणि स्वतःच लेखिका बनून पुस्तकं लिहिली. ती सर्व बेस्ट सेलर्सच्या यादीत झळकली.

लखलखीत प्रकाशात वावरणाऱ्या या स्त्रीच्या भूतकाळात एक भयभीषण घटना घडून गेली होती. निर्दय, निष्ठूर आणि निर्घृण अत्याचाराची ही कथा तिच्या मनात निद्रिस्त ज्वालामुखीसारखी दडून होती. अचानक या घटनेला वाचा फुटली आणि सारं जग नखशिखांत हादरून गेलं.

या स्त्रीचा जीवनप्रवास मी एका दिवाळी अंकासाठी शब्दबद्ध केला. वाचकांच्या मनाचा तिनं ठाव घेतला. शेकडो फोन्स, पत्रं आणि मेसेजिस आले. दिवा प्रतिष्ठानच्या वाचक स्पर्धेत सर्वोत्कृष्ट कलाकृती म्हणून या कादंबरीची निवड झाली. वाचकांची मागणी तीही आग्रहाची म्हणून पुस्तकरूपात ती प्रसिद्ध झाली. पुस्तकाला अनेक पुरस्कार मिळाले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात वाचकांना परवडेल अशा किमतीत ही कलाकृती नव्या रूपात प्रकाशित होत आहे. असंख्य वाचकांच्या हाती ही कलाकृती पडली तर 'वारीस'नं दिलेल्या अन्याय आणि अत्याचारविरोधी लढ्याला आणखीन बळ मिळेल आणि अनेक कोमेजलेल्या कळ्या नव्या जोमानं फुलून येतील, अशी खात्री वाटते.

✦✦✦



# उपोद्घात

**वारीस डियरीची जीवनकथा म्हणजे एक अद्भुत आणि अविश्वसनीय परीकथाच आहे.**

ती एका छोट्याशा झोपडीत जन्मली. क्षितिजापर्यंत पसरलेल्या रखरखीत, वैराण आणि रुक्ष वाळवंटात शेळ्यांची राखण करत करत ती मोठी झाली. उंटाचं दूध हेच तिचं अन्न होतं. काहीतरी वेगळं खावंसं वाटलं, तर जवळपासच्या झाडाझुडपांचा पाला खाऊन ती जिभेचे चोचले पुरवायची. चूल पेटवायसाठी तिला तापलेल्या वाळूवरून मैलोगणती फिरून सरपण गोळा करावं लागायचं. घरी आल्यावर आईनं चुलीवर बनवलेली सातूची लापशी पुढ्यात येईपर्यंत ती चिमुरडी गाढ झोपी गेलेली असायची. दिवसभराच्या वणवणीमुळं भुकेपेक्षा झोपेनं तिच्यावर जास्त पगडा बसवलेला असायचा. वह्यापुस्तकं जाऊ द्या, धुळाक्षरांची ओळखसुद्धा तिला नव्हती. जगभरातल्या असंख्य चिमुकल्या पोरींच्या वाट्याला येणारी भातुकलीची खेळणी तिच्या स्वप्नातदेखील येत नव्हती, कारण ती तिला ठाऊकच नव्हती.

नियती निष्ठुर असते…

नियती निर्दयी असते…

नियती निर्घृणही असू शकते… पण किती?

वारीसनं बालपणी भोगलेल्या भयभीषण नरकयातनांची आणि नंतर तिच्या आयुष्यात झालेल्या परिवर्तनाची कथा 'रीडर्स डायजेस्ट'च्या अंकात मला वाचायला मिळाली. या जागतिक कीर्तीच्या मासिकानं ही कथा संक्षिप्त स्वरूपात प्रसिद्ध केली होती. ती काहीशी निवेदनाच्या अंगानं जाणारी होती. कथेचं प्रारूप काहीसं सरधोपटही होतं; पण एका अतिसामान्य मुलीच्या आयुष्यात घडत गेलेल्या असामान्य घडामोडींच्या आड दडलेल्या संवेदनशीलतेच्या स्पर्शानं मी शहारून गेलो, थरारून गेलो. माझ्या डोळ्यांत अश्रूंनी गर्दी केली, घशात आवंढा आला आणि अखेरीस माझ्या वयाचा, आसपासच्या वातावरणाचा आणि सभोवती

वावरणाऱ्या मुलामाणसांचा मुलाहिजा न ठेवता मी माझ्या डोळ्यांतल्या अश्रूंना मुक्तपणे ओघळू दिलं. समुद्राच्या थंडगार पाण्यावर तरंगणाऱ्या हिमनगाचा बराच मोठा भाग पाण्याखाली दडलेला असतो. तद्वत या मुलीच्या जीवनकथेचा बराच मोठा भाग या कथेत प्रतिबिंबित झाला असावा. कथा त्रोटक आणि तुटक असावी असं मला वाटत होतं. म्हणून मी इंटरनेटच्या माध्यमातून वारीसची मिळेल ती सर्व इत्थंभूत माहिती गोळा केली आणि मी अवाक् झालो!

त्या इवल्याशा अजाण पोरीच्या नशिबी इतकं क्रूर आणि कराल दुःख कसं येऊ शकतं? परमेश्वर इतका न्यायनिष्ठुर कसा होऊ शकतो? भावविवश झालेल्या माझ्या मनात त्या धिटुकल्या मुलीविषयी वाटणारी कणव आकाशात जमणाऱ्या आषाढ मेघांप्रमाणे दाटून आली. काही क्षण का होईना, मला परमेश्वराच्या संवेदनहीनलतेचा तिरस्कार वाटू लागला. ईश्वराच्या अस्तित्वाला आव्हान देण्याइतका मी नास्तिक नसलो तरी त्याच्या अस्तित्वाच्या संकल्पनेला सुरुंग लागावा अशी वारीसची कहाणी काळीज पिळवटून टाकणारी होती खरी!

वारीसची कहाणी सविस्तरपणे वाचकांपुढे आलीच पाहिजे, या विचारानं मला झपाटून टाकलं. इंटरनेटवर तिच्या जीवनातल्या अनेक घडामोडी आढळून आल्या; पण त्यांचा अनुवाद करून वाचकांपुढे ठेवणं म्हणजे वाचकांवर अन्याय करण्याजोगं ठरणार होतं. कारण असा अनुवाद रुक्ष, रसहीन आणि रंजकतेचा अभाव असणारा झाला असता. म्हणून सत्याचा अपलाप न करता कल्पकतेची जोड देऊन मी तिच्या जीवनातले सारे धागे कोळ्याच्या जाळ्याप्रमाणे जुळवत गेलो. त्यामुळे काही पात्रांना कल्पनाशक्तीचा साजशृंगार चढवून वारीसच्या जीवनकथेशी जोडावं लागलं. असं करताना वास्तवाचा विपर्यास होऊ नये याची मी पुरेपूर काळजी घेतली आहे. काही क्लेशदायक घटना अशा होत्या की, त्या जशाच्या तशा मांडणं अवांच्छित ठरलं असतं; पण मी स्वतः व्यवसायानं डॉक्टर, जनरल सर्जरीच्या जोडीनं प्लास्टिक सर्जरीही करणारा. त्यामुळे शक्य तितक्या सौम्य आणि सोज्वळ शब्दात मी तो क्लिष्ट, किचकट आणि क्लेशकारक भाग शरीरशास्त्र (ॲनॉटॉमी) आणि शल्यचिकित्सा (सर्जरी) यांची जोड देऊन शक्य तितका स्पष्ट उभा केला आहे. तरीही वाचकांना त्यातील दाहकता जाणवल्याशिवाय राहणार नाही. वारीसनं हे कसं सहन केलं असेल, हा विचारही काळजाचा थरकाप उडवतो; पण 'भगवान के घर देर है लेकिन अंधेर नही', हेही खरंच!

वारीसची जीवनकथा वाचताना वाचकांचा रसभंग होऊ नये म्हणून म्हणा किंवा एखाद्या सत्यकथेला रुक्ष पार्श्वभूमीच्या झालरी लागू नयेत म्हणून म्हणा, मी प्रथम प्रास्ताविकातच स्थळ, काळ आणि आनुषंगिक माध्यमांचा परिचय करून देण्याचं योजलं आहे. वाचकांना ते वावगं वाटणार नाही, अशी मी आशा करतो. उणिवा आणि नेणिवा या तशा सापेक्षच असतात म्हणा! कलाकृतीचा न्यायनिवाडा करणं हे अखेरीस रसिकांच्याच हाती असतं.

सोमालिया नावाचा एक छोटासा देश जगाच्या पाठीवर कुठंतरी वसला आहे. भूगोलात त्याचा थोडाफार उल्लेख आढळतो इतकंच. बाकी त्या देशाला स्वतःचं वैशिष्ट्य म्हणावं तर काहीही नाही. अलीकडे त्याचं नाव वृत्तपत्रं आणि दृक्श्राव्य प्रसारमाध्यमांतून झळकू लागलं आहे; पण तेही काही चांगल्या कारणांसाठी नव्हे. प्रसिद्धी वाऱ्याच्या मंदगतीनं पसरते; पण कुप्रसिद्धी वावटळीसारखी झपाटून टाकते.

## सोमालियन पायरेट्स

सोमालियाच्या सागरी चाच्यांनी जगातल्या अनेक देशांची व्यापारी जहाजं पळवून नेऊन त्यांच्या मुक्ततेसाठी खंडणी गोळा करायला सुरुवात केली. प्रथमतः हा किरकोळ आणि निरुपद्रवी अपहरणांचा प्रकार आहे, असाच जगाचा समज होता; पण अशी अपहरणं वाढत गेली आणि मग सारं जग खडबडून जागं झालं. समुद्रावरची चाचेगिरी हा तसा शेकडो वर्षांपासून चालत आलेला प्रकार आहे. अलीकडे तो काहीसा बंदही झाला होता; पण सोमालियातील चाच्यांनी त्याला पुन्हा एकदा उजाळा दिला. छोटे छोटे दीनदुबळे देश थोडीफार तडजोड करून, चार पैसे खंडणी देऊन त्यांची लहानसहान व्यापारी जहाजं सोडवून घेत असत; पण अशा किरकोळ कमाईवर संतुष्ट न राहता त्या चाच्यांनी आपला मोर्चा बलिष्ठ राष्ट्रांच्या मोठ्या जहाजांकडे वळवला आणि संघर्षाला प्रारंभ झाला.

अमेरिका, रशिया, चीन, जपान, भारत आणि काही युरोपियन देशांनी या समुद्री लुटारूंविरुद्ध आघाडी उघडली. त्याचं ताजं उदाहरण म्हणजे जामा इदिल इब्राहिम या चाच्याला वॉशिंग्टन डी.सी.च्या फेडरल जज्जांनी दिलेली पंचवीस वर्षांची सक्तमजुरी.

इब्राहिमनं डेन्मार्कच्या एका व्यापारी जहाजाचं अपहरण केलं. त्यावेळी त्याला त्या जहाज कंपनीनं १७ दशलक्ष डॉलर्सची खंडणी देऊन आपलं जहाज सोडवून घेतलं आणि जहाजावरच्या माणसांचीही सुखरूप सुटका करून घेतली;

पण या यशानं उन्मत्त होऊन इब्राहिमनं दुसऱ्या एका जहाजावर हल्ला करून त्याचं अपहरण केलं. ते जहाज व्यापारी जहाज नसून ती अमेरिकेची ॲशलॅण्ड नावाची छोटी युद्धनौका होती, हे इब्राहिमचं दुर्दैवंच! त्या युद्धनौकेनं सर्वसामर्थ्यानिशी त्या चाच्यांच्या जहाजावर प्रतिहल्ला केला आणि त्यांना ताब्यात घेतलं.

'जंबूक करी गर्जना, जोवरी नाही देखिले पंचानना', असाच प्रकार घडला आणि त्या सोमाली चाच्यांना धूळ खावी लागली, इब्राहिमला जेरबंद केलं.

अलीकडे भारतीय नौदलाच्या युद्धबोटींनी आंतरराष्ट्रीय समुद्रावर गस्त घालण्यास सुरुवात केली आहे. इतरही अनेक देशांनी भारताचा किस्सा गिरवला आहे. त्यामुळे या चाचेगिरीला बराच आळा बसला आहे, असं म्हणता येईल.

सोमालिया इतका गरीब देश आहे की, तेथील खेड्यापाड्यांतल्या जनतेला आधुनिकतेचा स्पर्श तर जाऊ द्याच; पण अन्न, वस्त्रं, निवारा या मूलभूत गरजांचीही वानवाच आहे. नळातून येणारं पाणी, तारेतून येणारी वीज आणि गिरण्यांतून मिळणाऱ्या वस्त्रांचा त्या देशातील दरिद्री जनतेशी अजिबात संबंध येत नाही. सोमाली शिलिंग हे त्या देशाचं चलन आहे. ते जगात कुठेही चालत नाही.

सोमालियाचं पूर्ण नाव सोमाली डेमॉक्रेटिक रिपब्लिक. या देशाचं ६,३७,६७५ चौरस मैल एवढं क्षेत्रफळ आहे आणि लोकसंख्या साधारण एक कोटीच्या आसपास. मूळ सोमाली रहिवासी हे काळे आफ्रिकन लोक. त्यांची संख्या सुमारे ८५ लाख. बाकी जवळपासच्या प्रदेशातून आलेले बांटू आणि अरब लोक आहेत.

तेथे प्रामुख्याने सोमाली नावाची अगम्य वाटणारी भाषा बोलली जाते. शिवाय अरेबिक, इटालियन आणि इंग्रजी या भाषाही बोलल्या जातात, त्या अर्थात मोठ्या शहरांतूनच; पण आतल्या प्रदेशात सोमाली भाषेचं प्राबल्य आहे.

सुन्नी मुस्लीम पंथाचं तिथं प्राबल्य आहे. एकेकाळी इटलीनं तिथं आपलं बस्तान बसवण्याचा प्रयत्न केला होता. त्या काळात तिथं ख्रिश्चन धर्माचा थोडाफार शिरकाव झाला होता. इटलीला त्या वाळवंटात ना तेल सापडलं ना खनिजं. त्यामुळे त्यांनी सोमालियातून चुपचाप काढता पाय घेतला.

२००५ सालच्या जुलै महिन्यात 'टीएफजी' म्हणजे ट्रान्झिशनल फेडरल गव्हर्न्मेंट' अस्तित्वात आलं. शेख शरीफ शेख अहंमद या सधन आणि सामर्थ्यवान माणसाला अध्यक्षपद देण्यात आलं; पण प्रत्यक्ष कार्यवाही सुरू होण्यासाठी त्याला चार वर्षं झगडावं लागलं होतं, म्हणजे जानेवारी २००९ पर्यंत.